नवराष्ट्र

Pune | 17 October 2026 | Page 2

# कर्तृत्ववान महिलांच्या यशोगाथा प्रेरणादायी

## माजी न्यायमूर्ती डॉ. शालिनी फणसळकर यांचे प्रतिपादन

पुणे, शहर प्रतिनिधीः ''स्त्री आणि पुरुष यांच्या क्षमता किंवा धैर्यामध्ये कोणताही भेद नसतो. महिलांनी स्वतःमधील सुप्त गुण ओळखून आत्मविश्वासाने आपले कर्तृत्व सिद्ध केले पाहिजे,'' असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती डॉ. शालिनी फणसळकर-जोशी यांनी केले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या (डीईएस) श्री. नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालयातर्फे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित 'अस्मि ४.० – संवाद नवदुर्गांशी' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दहा कर्तृत्ववान महिलांचा या वेळी गौरव करण्यात आला. डीईएसचे उपाध्यक्ष अॅड. अशोक पलांडे अध्यक्ष स्थानी होते.फणसळकर-जोशी म्हणाल्या, ''अनेक क्षेत्रे आजही पुरुषप्रधान आहेत. मात्र, महिलांनी अशा परिस्थितीतही स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवून पुढे आले पाहिजे.





### दबावाला बळी न पडता भूमिकेवर ठाम राहावे

पुणे शहराच्या अतिरिक्त पोलिस आयुक्त तेजस्वी सातपुते म्हणाल्या, ''प्रशासकीय सेवेत घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा नागरिकांच्या जीवनावर थेट परिणाम होत असतो. त्यामुळे जबाबदारीची जाणीव आणि प्रामाणिकपणा अत्यंत महत्त्वाचा आहे. आव्हानात्मक परिस्थितीत मानसिक खंबीरपणा राखून राजकीय अथवा सामाजिक दबावाला बळी न पडता न्याय्य भूमिकेवर ठाम राहिले पाहिजे.'''' महिलांना केवळ आदर्शत्वाच्या चौकटीत बंदिस्त न करता स्वतंत्र आणि आनंदी व्यक्ती म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. त्यासाठी समाजाचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे,'' असे मत जागतिक विजेत्या पॉवरलिफ्टर डॉ. शर्वरी इनामदार यांनी व्यक्त केले.

### या कर्तृत्वान महिलांचा करण्यात आला गौरव

पुणे मनपाच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, आयकर विभागाच्या सहायक संचालिका मधुलिका कदम, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता कुलकर्णी, आयकर विभागाच्या उपायुक्त दीपिका जोसेफ, डॉ. माया दीक्षित, प्राचार्या डॉ. क्रांती देशमुख, एचडीएफसी बँकेच्या पुणे विभागाच्या उपाध्यक्षा मनीषा सेठ.